वि.दि.दा. क्र.६१/२०१८.
नि.क्र.२१

प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ तर्फे उलटतपास विद्वान वकील श्री. जी. एम. निकम यांचेमार्फतः–

१३. माझे शिक्षण वर्ग दहावी नापास पर्यंत कुकाणा येथे झालेले आहे. माझी जन्म तारिख दिनांक ०१/०६/१९५९ अशी आहे. मी भेंडे येथे रहातो. कुकाणा येथे आमचे वडीलोपार्जित घर आहे. माझे वडीलांचे पुर्ण नाव दादाबा दशरथ गोर्डे असे आहे. ते माझे वडील असल्याबाबतचे दस्त माझ्या कडे आहेत. माझा जन्म भातकुडगांव, ता. शेवगांव येथे माझ्या मामाच्या घरी झालेला आहे. माझ्या मामाचे नाव दौलत नाना साळवे असे आहे. मी माझ्या जन्माचा दाखला पाहिलेला नाही. मी माझ्या शाळेच्या दाखल्या नुसार म्हणत आहे की, दादाबा हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दादाबा गोर्डे हे माझे वडील नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे नाव साहेबराव गंगाधर खरसन असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे खरे नाव भास्कर साहेबराव खरसन असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी जन्म तारीख १८/०७/१९५९ अशी आहे. माझ्या आईचे नाव साखरबाई दादाबा गोर्डे असे आहे.

१४. माझे प्राथमिक शिक्षण कुकाणा येथे झाले आहे. मी बँक ऑफ बडोदा शाखा भेंडे येथे शिपाई म्हणुन कार्यरत होतो. भेंडे येथे मी, माझी पत्नी व दोन मुले असे राहतो. माझी दोन मुले व तीन मुली यांची लग्न झाली आहेत. माझी शेती रांजणगांव देवि, ता. नेवासा येथे आहे. भेंडे येथील माझ्या घरापासुन बँक ऑफ बडोदा ही बँक एक किलोमीटर अंतरावर आहे. माझी शेत जमीन ही माझ्या घरापासुन साडे तीन कि.मी. अंतरावर आहे. माझे घरापासुन कुकाणा हे गांव पाच कि.मी. अंतरावर आहे.

१५. गट नं.१९७ हा वडीलोपार्जित असल्या बाबत मी केस मध्ये दस्त दाखल केलेले

नाहीत. सदर गट नं.१९७ बाबत इंदुबाई साळवे व साहेबराव भानुदास गोर्डे यांनी उपविभागीय अधिकारी अहमदनगर यांच्या कडे तक्रार दिली होती. इंदुबाई ही माझी आत्या आहे, तसेच सासु देखील आहे. मी सिटी सर्वे नं.३१३ व ३१४ बाबत काही कागदपत्र दाखल केलेली आहेत किंवा नाही याबाबत मला आठवत नाही.

**न्यायालयाची वेळ संपल्याने साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.03.03 18:05:25 +0530

दिनांक – ०३/०३/२०२५

**(एस.एन. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
नेवासा